NAAC Accredited-२०१५
'Bङ Grade (CGPA २.६२)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ

## आरोग्य विज्ञान संकुला अंतर्गत चालविला जाणारा कौशल्य विकास केंद्र मान्यता प्राप्त

## योग शिक्षक पदविका अभ्यासक्रम (Diploma in Yoga Teacher)

योग विषयाचे वाढलेले जागतिक महत्व व आरोग्याच्या दृष्टीने योगा कडे वाढत असलेला सामान्य लोकांचा ओढा पाहून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या आरोग्य विज्ञान संकुला अंतर्गत कौशल्य विकास केंद्राचा **१ वर्ष** कालावधीचा **'योग शिक्षक पदविका'** हा पार्ट- टाईम अभ्यासक्रम चालू आहे. सदर अभ्यासक्रमाच्या साल २०२१-२२ या शैक्षणिक वर्षातील प्रवेश प्रक्रिया दि.२५ जून २०२१पासून चालू होत आहे. १२ वी पास अथवा त्यावरील कोणतेही शिक्षण घेणारे विद्यार्थी/विद्यार्थिनी अथवा नोकरदार/व्यवसाय काम करणाऱ्या १८ वर्षांवरील व्यक्ती या अभ्यासक्रमास प्रवेश घेण्यास पात्र ठरतील. सदर अभ्यासक्रम १ वर्ष कालावधीचा असून दर आठवड्यातील शनिवार व रविवार सकाळी ६ ते ८ व सायंकाळी ६ ते ८ अशा दोन वेळेत चालणार आहे. सदर अभ्यासक्रम हा मराठी भाषेत असून अभ्यासक्रमाची विस्तृत माहिती विद्यापीठ संकेतस्थळावर कौशल्य विकास केंद्राच्या http://su.digitaluniversity.ac/WebFiles/Diploma%20in%20Yoga%20Teacher%2001022020.pdf या लिंक खाली उपलब्ध आहे.

सदर अभ्यासक्रमाचे शुल्क प्रती विद्यार्थी रु.८००० इतके असणार आहे. शुल्क रु.४००० च्या दोन हफ्त्यात भरता येईल.सदर अभ्यासक्रम हा विद्यापीठ कौशल्य विकास केंद्राचा स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर चालविला जाणारा

पदविका  अभ्यासक्रम असल्याने या अभ्यासक्रमासाठी शासनाची कोणत्याही प्रकारची शिष्यवृत्ती अथवा शुल्क सवलत लागू असणार नाही. हा अभ्यासक्रम पूर्ण केल्या नंतर विद्यापीठ कौशल्य विकास केंद्राचे प्रमाणपत्र देण्यात येईल. हा अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या व्यक्तीस भविष्यात मान्यता प्राप्त योग शिक्षक म्हणून काम करता येऊ शकेल तसेच स्वतःचे योगाचे वर्ग घेऊन योग प्रसाराचे कार्य करता येईल व अर्थाजन करता येऊ शकेल.

सदर अभ्यासक्रमाचे प्रवेश दि.२५ जून २०२१  पासून दि.१० जुलै २०२१  पर्यंत चालू राहणार आहेत. सदर अभ्यासक्रमास प्रवेश मर्यादा ६० विद्यार्थी इतकी असून  प्रवेशासाठी प्रथम येईल त्याला प्रथम प्रवेश या तत्वावर प्रवेश दिला जाईल. सदरच्या अभ्यासक्रमासाठी विद्यापीठाच्या संकेत स्थळावर कौशल्य विकास केंद्र http://su.digitaluniversity.ac/WebFiles/Admission%20Form%2023-09-2019.pdf  या लिंक मध्ये जाऊन एडमिशन फॉर्म डाऊनलोड करून तो पूर्णपणे भरून त्याची स्कॅन कॉपी तसेच शैक्षणिक शुल्क भरल्याची पावती sahs@sus.ac.in  या इ मेल वर पाठवून द्यावी. आपला फॉर्म मेल केल्या नंतर सदर संकुल क्लर्क श्री.ऋषिकेश माने यांना ९८५०३६१६३१  या क्रमांकावर संपर्क करून आपला फॉर्म व पावती विद्यापीठास मिळाला असल्याची खात्री करून घ्यावी. प्रवेश अर्ज व शैक्षणिक शुल्क पूर्ण भरल्याशिवाय प्रवेश ग्राह्य धरला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

प्रवेश अर्जावर आपला फोटो चिटकवून अर्ज पूर्ण भरून त्या सोबत खालील कागद पत्रे स्कॅन करून जोडणे आवश्यक आहे.

१. १२ वी उत्तीर्ण प्रमाणपत्र

२. आधार कार्ड झेरॉक्स प्रत

३. शैक्षणिक शुल्क ऑनलाईन भरले असल्याच्या पुरावा

अधिक माहिती साठी अभ्यासक्रम समन्वयक **डॉ.अभिजित जगताप {संपर्क क्रमांक:९७३०१०५९६१**  यांच्याशी सकाळी १०.३० ते सायंकाळी ६.०० या वेळेत संपर्क साधावा असे आवाहन विद्यापीठाच्या वतीने करण्यात येत आहे.

**ऑनलाईन शुल्क भरण्यासाठी माहिती:**

Name: **Finance and Account Officer, Solapur University, Solapur**

Name of Bank: **Central Bank of India**

Name of Branch: **Kondi, Solapur**

Account Number: **3177057679**

IFSC Code: **CBIN0282815**

MICR Code: **413016005**